# SPANDAN CAREER INSTITUTE

THE WAY OF SUCCESS…

**A**

**प्रश्नपुस्तिका क्र.**
**BOOKLET No.** **GS2021**


**Total Que. : 100**
**Marks : 200**
**Time : 120 min**

**Mob. No. 9923262977**
**Date :28/11/2021**

**राज्यसेवा (पूर्व) सराव परिक्षा - 2021**
**विषय : — सामान्य अध्ययन [011]**
**पेपर क्र. (१११)**

**सूचना**

१. सदर प्रश्नपुस्तिकेत १०० अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरूवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका पर्यवेक्षकाकडून लगेच बदलू




२. आपला परीक्षा—क्रमांक हया चौकोनांत न विसरता बॉलपेनने लिहावा.

३. वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे न विसरता नमूद करावा.

४. अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला ४ पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना १,२,३ आणि ४ असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवर सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करतांना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी.

५. सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. अशा प्रकारे प्रश्न सोडविणे सोयीस्कर आहे; पण एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे. अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नाकडे परतणे सोईस्कर ठरेल.

६. उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

७. प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या **प्रत्येक चुकीच्या उत्तरांसाठी एक चतुथांश गुण वजा करण्यात येतील**.

**Note : Test Series Paper Online available**

**Visit us**

www.spandancareers.org

1. भारतीय राज्यघटनेत भाग 3 मधील कलम 14 ते 18 मध्ये समानतेचा हक्क संबंधी कलमे आहेत. त्या संबंधित खालील विधानांपैकी बरोबर नसलेले विधान ओळखा.

अ) 'कायदेशीर समानता' हा हक्क ब्रिटनच्या घटनेवरून तर 'कायद्याचे समान संरक्षण' हा हक्क अमेरिकन घटनेवरून घेण्यात आला आहे.

ब) 'कायद्यासमोर समानता' ही एक सकारात्मक संकल्पना आहे. तर 'कायद्याचे समान संरक्षण' ही एक नकारात्मक संकल्पना आहे.

1) फक्त अ 2) दोन्ही ही नाही 3) दोन्हीही 4) फक्त ब

---

2. खालील विधानांचा विचार करा व योग्य नसलेले / नसलेली विधान / विधाने कोणती ते ओळखा.

अ) संसद तसेच विधानसभेतील विद्यमान उमेदवारांच्या निवडणुकोत्तर अपात्रतेसंबंधी काही प्रकरण उदभवसल्यास निवडणूक आयोग सल्ला देण्याचे कार्य करू शकते.

ब) निवडणूक आयोगाने दिलेला सल्ला राष्ट्रपती किंवा राज्यपाल यांच्यावर बंधनकारक असतो.

क) निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने निवडणूक खर्चाविषयी लेखाजोखा जमा केला नाही तर निवडणूक आयोग अशा उमेदवारास अपात्र घोषित करू शकते.

1) फक्त क 2) ब व क 3) अ व क 4) कोणतेही नाही

---

3. भारतीय राज्यघटनेतील मुलभूत कर्तव्यांच्या यादीत खालीलपैकी काय समाविष्ट नाही ?

1) देशाचे संरक्षण करणे व आवाहन केले जाईल तेव्हा राष्ट्रीय सेवा बजाविणे.

2) आपल्या संमिश्र संस्कृतीच्या समृध्द वारशांचे मोल जतन करून जे जतन करणे.

3) वेळोवेळी आयकर भरणे.

4) सार्वजनिक मालमत्तेचे संरक्षण करणे.

---

4. जिल्हा परिषद विषयी पुढील विधानांचा विचार करा.

अ) जिल्हा परिषद पंचायत राज व्यवस्थेच्या सर्वात वरच्या पातळीवर असणारी संस्था आहे.

ब) जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपरिषदा व ग्रामीण लोकवस्तीच्या भागासाठी असतात.

क) जिल्हा परिषदेवर निर्वाचित प्रतिनिधी व काही पदसिध्द सदस्य असतात.

वरीलपैकी योग्य विधाने ओळखा.

1) अ, ब, क 2) अ, क 3) ब व क 4) फक्त अ

---

5. राज्य धोरणाची मार्गदर्शक तत्वे ही घटनेचे नाविण्यपूर्ण वैशिष्टये आहे, असे कोणी म्हटले आहे ?

1) डॉ.के.एम. मुन्शी 2) सर बी.एन.राव 3) डॉ. बाबासाहेब आंबेडकर 4) जे.बी. कृपलानी

---

6. राज्यांच्या पुनर्रचनेसंबंधी खालील विधानांचा विचार करा.

अ) भारत सरकारने ऑगस्ट 1956 मध्ये राज्य पुनर्रचना कायदा, 1955 संमत केला.

ब) या कायद्याची अंमलबजावणी 1 नोव्हेंबर 1956 पासून करण्यात आली.

क) या कायद्याने भारतात 14 राज्ये व 6 केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले.

ड) 8 व्या घटनादुरूस्ती (1956) व्दारे जुन्या पहिल्या अनुसूचिच्या जागी 14 राज्ये व 6 केंद्रशाति प्रदेशांची यादी असलेली नवीन पहिली अनुसूची समाविष्ट करण्यात आली

खालील विधानांपैकी योग्य असलेली विधाने ओळखा.

1) वरील सर्व विधाने योग्य 2) फक्त अ, ब, क योग्य

3) फक्त अ, ब, ड योग्य 4) फक्त ब, क, ड योग्य

---

7. दहावी अनुसूची कोणत्या वर्षी समाविष्ट करण्यात आली.

1) 61 वी घटनादुरूस्ती (1975) 2) 52 वी घटनादुरूस्ती (1985)

3) 91 वी घटनादुरूस्ती (1991) 4) वरीलपैकी कोणतेही नाही

---

8. संविधान सभेच्या कामकाजा संदर्भात खालील विधाने विचारात घ्या.

अ) 9 डिसेंबर 1946 राजी संविधान सभेची पहिली बैठक झाली

ब) मुस्लिम लीगचे मोजकेच सदस्य सभेला हजर होते.

क) बैठकीला एकूण 211 सदस्य हजर होते.

ड) इंग्लंडच्या पध्दतीचे अनुसरण करून ज्येष्ठतम सदस्य असलेल्या डॉ. सच्चिदानंद सिन्हा यांची तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली.

1) फक्त ड 2) अ व क 3) अ, ब व क 4) वरील सर्व

---

9. मूळ भारतीय राज्यघटनेत अनुसूचित जाती / जमाती व अॅंग्लो भारतीय यांना किती वर्षांसाठी राखीव जागा आणि प्रतिनिधीत्व असण्याची तरतूद होती ?

1) 10 वर्षे 2) 15 वर्षे 3) 20 वर्षे 4) 70 वर्षे

---

10. भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक राजीनामा कोणाला संबोधून देतात ?

1) सरन्यायाधीशांना 2) लोकसभेचे अध्यक्ष 3) उपराष्ट्रपती 4) राष्ट्रपती

---

11. 6 व्या अनुसूचीमध्ये कोणत्या राज्यातील आदिवासी क्षेत्राच्या प्रशासनाबाबत तरतूदी आहेत ?

अ) आसाम ब) मेघालय क) मणिपूर ड) त्रिपुरा इ) मिझोराम

1) फक्त अ, ब, क 2) फक्त अ, ब, क, ड 3) फक्त अ, ब, ड, इ 4) वरीलपैकी सर्व

---

12. भारताच्या राज्यघटनेनुसार राष्ट्रपतीवर ..........................

1) मंत्रीमंडळाचा सल्ला बंधनकारक आहे. 2) मंत्रीमंडळाचा सल्ला बंधनकारक नाही

3) मंत्रीमंडळ सल्ला देत नाही 4) वरीलपैकी नाही

---

13. घटनादुरूस्तीची तरतूद राज्यघटनेच्या कितव्या भागांत आहे ?

1) भाग - 15 2) भाग - 18 3) भाग - 20 4) भाग - 22

---

14. भारतातील सर्वात जास्त कोळसा साठा खालीलपैकी कोणत्या राज्यात आहे ?

1) आसाम 2) महाराष्ट्र 3) झारखंड 4) प. बंगाल

---

15. भारतीय संघराज्याविषयी खालीलपैकी कोणते विधान योग्य आहेत ?

अ) केंद्र राज्यामध्ये सत्तेची विभागणी ब) प्रबळ केंद्र सरकार

क) राज्यसभेचे सर्व राज्यांना समान प्रतिनिधीत्व

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ व ब 4) वरीलपैकी सर्व

---

16. विधान A : सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालये हेबियस कॉर्पस फंट (प्राधिलिख) निर्गमित करू शकतात.

स्पष्टीकरण R : सर्वोच्च आणि उच्च न्यायालये दोन्ही रिट निर्गमित करण्याचा समान अधिकार आहे.

1) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे

2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही

3) विधान A योग्य व R अयोग्य

4) विधान A अयोग्य व R योग्य

---

17. योग्य जोडया लावा.

1) 1960 I) सिक्किम

2) 1962 II) गोवा

3) 1875 III) महाराष्ट्र

4) 1987 IV) नागालॅंड

1) III IV II I 2) III IV I II

3) I II III IV 4) I II IV III

---

18. मुलभूत हक्कात दुरूस्ती करण्याचा अधिकार कोणाला आहे ?

1) राष्ट्रपती 2) सर्वोच्च न्यायालय 3) संसद 4) वरीलपैकी नाही

---

19. योग्य जोडया लावा.

| (गट ‘अ’) | (गट ‘ब’) |
|---|---|
| 1) कलम 54 | I) राष्ट्रपतींची निवडणूक |
| 2) कलम 75 | II) पंतप्रधानांची नियुक्ती |
| 3) कलम 155 | III) राज्यपालांची नियुक्ती |
| 4) कलम 164 | IV) मुख्यमंत्र्यांची नियुक्ती |

1) I II III IV 2) I II IV III

3) III IV I II 4) IV III I II

20. राज्याच्या विधानपरिषदेसंदर्भात खालीलपैकी कोणते विधान अयोग्य आहे ?

1) संसद कायद्याव्दारे विधानपरिषद गठित करू शकते.

2) यासाठी राज्याच्या विधानसभेने सभाग़हाच्या एकूण सदस्यांच्या बहुमताने प्रथम ठराव पारित करावा लागतो.

3) विधानसभेतील उपस्थित व मतदान करणाऱ्या सभासदांच्या 2/3 हुन कमी नाही इतक्या बहुमताने ठराव पारित करावा लागतो

4) विधानपरिषदेची स्थापना भारतीय राज्यघटनेचा कलम 169 (3) अन्वये संवैधानिक सुधारणा असल्याचे गृहित धरली जाते.

21. खालीलपैकी कोणाच्या काळात महाराष्ट्रात प्रथमच राजसत्तेचा उदय झाला ?

1) वाकाटक 2) राष्ट्रकुट 3) सातवाहन 4) चालुक्य (बदामीचे)

22. सातवाहनांसंबंधी खालीलपैकी योग्य विधाने निवडा.

1) सातवाहन काळामध्ये महाराष्ट्राचा एकांगी आर्थिक विकास झाल्याचे दिसून येते.

2) सातवाहन राजे हे वैदिक धर्माचे अनुयायी व पुरस्कर्ते होते

3) सातवाहन काळात वर्णव्यस्थेचे रूपांतर जाती व्यवस्थेत झालेले होते ?

4) ब आणि क योग्य

23. ‘द पोस्ट ऑफीस’ हे पुस्तक कोणाचे आहे ?

1) स्वामी विवेकानंद 2) रविंद्रनाथ टागोर

3) मेरी मन्रो 4) लोकमान्य टिळक

24. योग्य जोडया लावा.

| (गट ‘अ’) | (गट ‘ब’) |
|---|---|
| 1) कित्तुरांचा उठाव | I) 1828 - 1830 |
| 2) रामोशी उठाव | II) 1833 - 1862 |
| 3) अहोम उठाव | III) 1829 |
| 4) संभलपूर उठाव | IV) 1822 - 1826 |

1) I II III IV 2) III IV I II

3) IV III II I 4) IV I II III

25. यावली, चिमूर, आष्टी येथे कोणाच्या प्रेरणेने जनतेने आंदोलन केले ?

1) उषा मेहता 2) जयप्रकाश नारायण

3) तुकडोजी महाराज 4) क्रांतिसिंह नाना पाटिल

26. खालील विधाने वाचून योग्य पर्याय निवडा ?

अ) डॉ. भांडारकर, विन्सेंट स्मिथ या इतिहासकारांनी सातवाहनांचा ‘आंध्रवंशी’ असा उल्लेख केलेला आहे.

ब) सातवाहन राजकर्त्यांनी त्यांच्या स्वत:च्या शिलालेखामध्ये स्वत:बाबत ‘आध्र’ असा उल्लेख केलेला नाही.

क) डॉ. वा. दी. मिराशी व डॉ. प्रभाकर देव सातवाहनांना मुळचे महाराष्ट्रतील मानतात.

1) फक्त अ योग्य 2) अ आणि ब योग्य 3) अ आणि क योग्य 4) अ, ब आणि क योग्य

27. योग्य जोडया लावा.

| (गट ‘अ’) | (गट ‘ब’) |
|---|---|
| 1) नानासाहेब | I) दिल्ली |
| 2) बहादुरशहा जफर | II) कानपूर |
| 3) बेगम हजरत महल | III) अवध |
| 4) मणी राम दत्त | IV) आसाम |

1) I II IV III 2) I II III IV

3) II I III IV 4) II I IV III

www.spandancareers.org

28. खालील दिलेली काही शेतकरी आंदोलन कालानुक्रमे लिहा व योग्य पर्याय निवडा.

अ) चंपारण्य सत्याग्रह ब) एका आंदोलन क) अवध किसान सभा ड) तेभागा आंदोलन

1) अ-क-ब-ड 2) अ-ब-क-ड 3) क-ब-अ-ड 4) ब-ड-अ-क

29. खालील विधाने लक्षात घ्या.

अ) विधवा विवाहोत्तोजक मंडळाला विरोध म्हणून सनातन्यांनी 'हिंदू धर्मव्यवस्थापक सभा' स्थापन केली.

ब) विष्णुशास्त्री पंडितांनी कुसाबाई या विधेवेशी न्याय कचेरीत दुसरा विवाह केला ?

वरीलपैकी योग्य विधान निवडा

1) फक्त अ 2) फक्त ब 3) अ व ब 4) वरीलपैकी नाही

30. विधान A : लॉर्ड रिपन याने कार्यकाल संपण्याअगोदरच राजीनामा दिला.

स्पष्टीकरण R : इल्बर्ट कायद्यामुळे इंग्रज शासनाने नाराज होउन लॉर्ड रिपन यांस राजीनामा देण्यास सांगितले

1) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण आहे

2) विधान A व R दोन्ही योग्य असून R हे A चे योग्य स्पष्टीकरण नाही

3) विधान A योग्य व R अयोग्य

4) विधान A अयोग्य व R योग्य

31. 'इंडस्ट्रीयल असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया' या संस्थेची स्थापना कोणी केली ?

1) दादाभाई नौरोजी 2) न्या. रानडे 3) एस. एम. जोशी 4) गो. कृ. गोखले

32. जैन धर्माविषयी योग्य पर्याय निवडा ?

अ) ऋषभदेव हे जैन धर्माचे पहिले तीर्थकार होते व यांचे जन्मस्थान अयोध्या होते

ब) वर्धमान महावीरांचा जन्म इ.स. पूर्व 540 ला झाला असे मानले जाते.

क) वर्धमान महावीरांना वयाच्या 42 व्या वर्षी परमज्ञान प्राप्त झाले आणि वर्धमान महावीरांनी अंगावरील वस्त्राचा परित्याग केला तसेच त्यांना परमोच्च ज्ञानप्राप्तीमुळे 'महावीर' असे नाव पडले.

ड) हिंसा करू नका, खोटे वा असत्य बोलू नका, चोरी करू नका, मालमत्ता गोळा करू नका, ब्रम्हाचर्याचे पालन करा. ही जैन धर्माची तत्वे होती.

1) अ, ब, क योग्य 2) अ, ब, ड योग्य 3) अ, ब, क, ड योग्य 4) यापैकी एकही नाही

33. ताम्रपाषाण संस्कृतीची (महाराष्ट्रातील) वैशिष्टयांबद्दल योग्य पर्याय निवडा.

अ) नवदोतोली, प्रकाशे, दायमाबाद, इनामगाव ही ठिकाण या संस्कृतीतील मोठी ठिकाणे होती.

ब) मातीची भांडी पातळ पृष्ठभागाची व पक्की भाजलेली असत. पृष्ठभागावर गडद तांबडया लेप व काळया रंगाने रंगवलेले काम दिसून येते

क) हरीण, मोर, चित्ता, बैल, पक्षी इत्यादीचे भांडयावर चित्रे काढलेली असत.

ड) तांबे या धातूचा अलंकार आणि हत्यारे बनविण्यासाठी वापर केला जात असे

1) फक्त अ, ड योग्य 2) फक्त ब, क, ड योग्य 3) फक्त अ, ब, ड योग्य 4) वरील सर्व योग्य

34. खालील पर्यायातून योग्य पर्याय निवडा

1) प्राचीन काळी 'आर्यवर्त' आणि 'दक्षिणपथ' असे भारताचे दोन विभाग होते

2) उत्तरेत आर्य व दक्षिणेत द्रविडी लोक राहत असत

3) विंध्य पर्वताच्या दक्षिणेकडील प्रदेशाला दक्षिणपथ म्हटले जायचे यामध्ये कलिंगा, आंध्र, सुराष्ट्र, आनर्त, अपरांत, कुंतल व देवराष्ट्र या भूभागाचा उल्लेख आढळतो.

4) वरीलपैकी सर्व योग्य

35. ताम्रपाषाण कृषी संस्कृतीविषयी योग्य पर्याय निवडा ?

1) धार्मिक जीवनामध्ये स्त्री-मूर्ती (मातीच्या) यावरून या संस्कृतीत लोक मातृपूजा करत असावेत

2) गायी, म्हैस, शेळया, मेंढया, डुक्करे पाळली जात असून हरणाची शिकार केली जात असे

3) या संस्कृतीतील लोकांचा घोडा या प्राण्यांशी परिचय नव्हता

4) वरीलपैकी सर्व योग्य

36. खाली दिलेल्या नद्यांची उत्तरेकडून दक्षिणेकडे क्रमवारी लावा.

शास्त्री, वाघोठाण, कर्ली, भातसा, दमणगंगा, सावित्रीउ, सुर्या

1) सूर्या, दमणगंगा, भातसा, शास्त्री, सावित्री, वाघोठाण, कर्ली

2) दमणगंगा, सूर्या, भातसा, सावित्री, शास्त्री, वाघोठाणृ कर्ली

3) दमणगंगा, सूर्या, सावित्री, भातसा, वाघोठाण, शास्त्री, कर्ली

4) सूर्या, दमणगंगा, भातसा, शास्त्री, सावित्री, कर्ली, वाघोठाण

---

37. खालील विधाने लक्षात घ्या

अ) भारतातील मान्सूनची तीव्रता ही उष्णकटीबंधीय वायुगर्तेवर (Depression) ठरवली जाते

ब) तामिळनाडूत पूर्वीय वाऱ्यांमुळे पाउस पडतो

क) मान्सून हे हंगामी वारे आहेत

ड) परतीच्या पावसाचा आंध्रप्रदेशात परिणाम जाणवत नाही.

वरीलपैकी अयोग्य विधान निवडा

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) फक्त ड

---

38. पश्चिम किनारपट्टीतील उद्योगांचा विकास झालेली मुख्य बंदरे ...................................... ही आहेत.

1) मुंबई, पणजी, मंगलोर 2) मुंबई, कोझीकोड, तिरूवनंतपुरम

3) मुंबईृ पणजी, तिरूवनंतपुरम 4) वरील सर्व

---

39. 2011 नुसार “लोकसंख्या घनतेच्या” उतरत्या क्रमानुसार योग्य पर्याय निवडा

1) बिहार- प. बंगाल- केरळ- उत्तरप्रदेश- पंजाब 2) पंजाब- उत्तरप्रदेश- केरळ- बिहार- प. बंगाल

3) उत्तरप्रदेश- पंजाब- केरळ- बिहार- प. बंगाल 4) केरळ- पंजाब- प. बंगाल- बिहार- उत्तरप्रदेश

---

40. गाविलगड डोंगररांग ............................... जिल्हयात पसरली आहे.

1) अमरावती, अकोला 2) अकोला, वाशिम 3) यवतमाळ 4) जळगाव

---

41. “तांदूळ” या पिकासंदर्भात खालीलपैकी अयोग्य विधान निवडा.

1) या पिकास हवामान थंड व कोरडे लागते

2) पर्जन्याचे प्रमाण 150 ते 200 सें.मी. लागते

3) पश्चिम बंगाल हे तांदुळ उत्पादनात आघाडीचे राज्य आहे

4) दर हेक्टरी उत्पादनात पंजाब हे राज्य अग्रेसर आहे

---

42. ............................... हे प्राणी कच्छच्या रणात आढळतात.

1) काळवीट, चिंकारा 3) काळवीट, जंगली गाढव

3) काळवीट 4) काळवीट, चिंकारा, जंगली गाढव

---

43. योग्य जोडया लावा

| (गट ‘अ’) | (गट ‘ब’) |
|---|---|
| 1) उस | I) केरळ |
| 2) कॉफी | II) आंध्रप्रदेश |
| 3) रबर | III) कर्नाटक |
| 4) तंबाखू | IV) उत्तरप्रदेश |

1) IV III I II 2) IV III II I

3) I II III IV 4) II I IV III

---

44. योग्य जोडया लावा.

| (गट ‘अ’) | (गट ‘ब’) |
|---|---|
| 1) भाबर | I) काराकोरम पर्वतरांग |
| 2) सियाचेन हिमनदी | II) हिमाचल प्रदेश |
| 3) बुंदेलखंड पठार | III) शिवालीक टेकडयांच्या पायथ्याशी |
| 4) रोहतांग खिंड | IV) गंगेचे मैदान व विंध्य पर्वतादरम्यान |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | I | II | III | IV | 2) | III | I | IV | II |
| 3) | IV | III | II | I | 4) | III | IV | I | II |

45. हिमालयातील वनसंपत्तीचे प्रमुख ........................ प्रकार आहेत

1) उष्णकटिबंधीय, उपोष्णकटिबंधीय 2) समशीतोष्ण, पर्वतीय

3) वरील दोन्ही योग्य 4) वरील दोन्ही अयोग्य

46. 'बोडो' ही जमात खालीलपैकी कोणत्या राज्यात आढळते ?

1) आसाम 2) मेघालय 3) सिक्कीम 4) अंदमान

47. भारताच्या मुख्य भूप्रदेशाचा अक्षवृत्तीय विस्तार ..................... उत्तर ते ......................... उत्तर आहे.

1) $8^0$ 4' 28", $37^0$ 7' 33" 2) $68^0$ 7' 33", $97^0$ 24' 47"

3) $15^0$ 5' 46", $22^0$ 24' 13" 4) $72^0$ 38' 45", $80^0$ 53' 17"

48. विषुववृत्तीय प्रदेशासंदर्भात खालील विधाने लक्षात घ्या

अ) वर्षभर वातावरण शांत असते

ब) जास्त तापमान असते

क) हवेत आर्द्रता जास्त असते

ड) जगातील सर्वात जास्त पाउस विषुववृत्तीय प्रदेशात पडत असतो

वरीलपैकी कोणते विधान / विधाने योग्य आहेत ?

1) अ, ब, क 2) अ, ब, क, ड 3) ब व ड 4) क व ड

49. काळया मृदेत .................... घटक द्रव्यांचे प्रमाण जास्त आहे.

1) चुनखडी, पोटॅश, लोह, सेंद्रिय 2) नायट्रोजन, फॉस्फरस, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम

3) चुनखडी, पोटॅश, लोह, सेंद्रीय द्रव्ये, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम

4) वरील सर्व

50. खालीलपैकी चुकीचे विधान निवडा.

अ) तपांबराच्या बाहय भागात हवेचा दाब 226 मिलीबार इतका असतो

ब) दर 160 मी. उंचीवर तापमानाची 1 अंश सें. ग्रे. ने घट होत असते

क) भूपृष्ठापासून 80 कि.मी. उंचीचा वातावरणाचा थर म्हणजे तपांबर होय.

1) फक्त अ 2) फक्त ब 3) फक्त क 4) वरील सर्व

51. गंगेच्या मध्य मैदानी प्रदेशातील .................... जिल्हयात काही प्रमाणात अभ्रक सापडते.

1) बीरभूम 2) बर्धमान 3) बांकुरा 4) गया

52. जगात आर्द्रतेच्या प्रमाणात पडण्याऱ्या पर्जनयासंदर्भात योग्य जोडया लावा.

| (आर्द्रता) | (वने) |
|---|---|
| 1) अत्यंत आर्द्र | I) 15 पेक्षा कमी |
| 2) आर्द्र | II) 35 ते 65 |
| 3) कमी आर्द्र | III) 65 ते 130 |
| 4) शुष्क | IV) 130 पेक्षा अधिक |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1) | I | II | III | IV | 2) | IV | III | II | I |
| 3) | II | I | IV | III | 4) | III | IV | I | II |

53. खालील देश विचारात घ्या.

अ) ब्राझील ब) इंडोनेशिया क) जपान ड) रशिया

लोकसंख्येच्या उतरत्या क्रमानुसार योग्य असलेला पर्याय ओळखा

1) अ, ब, क, ड 2) ब, क, अ, ड 3) ब, अ, ड, क 4) अ, ब, ड, क

54. शिवालिक रांगेची समुद्रसपाटीपासूनची सर्वसाधारण उंची ........................ मी आहे.

1) 900 ते 1100 2) 1000 ते 1200 3) 800 ते 900 4) 450 ते 700

55. योग्य जोडया लावा

| (सागरी गर्ता) | (महासागर) |
|---|---|
| 1) ॲल्युशियन | I) उत्तर पॅसिफिक महासागर |
| 2) सुंदा | II) हिंदी महासागर |
| 3) सॅन्डविच | III) अटलांटिक महासागर |
| 4) पोर्टोरिका | IV) उत्तर अटलांटिक महासागर |

1) I II III IV
2) II III IV I
3) III II I IV
4) IV III II I

56. खालीलपैकी कोणता भाग उत्तर भारतीय मैदानी प्रदेशाचा नाही ?

1) राजस्थानचे मैदान
2) पश्चिमी मैदानी प्रदेश (पंजाब-हरियाणाचा मैदानी प्रदेश)
3) गंगेचा मैदानी प्रदेश
4) उत्तर भारतीय पर्वतीय प्रदेश

57. खालीलपैकी कोणत्या वर्षी भारतात "जीवावरण आरक्षित क्षेत्र" चालू करण्यात आला ?

1) 1984
2) 1985
3) 1986
4) यापैकी नाही

58. आंतरराष्ट्रीय जैविक कार्यक्रमांतर्गत खालीलपैकी कोणत्या विभागांवर काम केले जाते ? याबाबत योग्य पर्याय निवडा.

अ) उत्पादन प्रक्रिया
ब) गोडया पाण्यातील समाजाची उत्पादकता
क) सागरी समाजाची उत्पादकता
ड) भूप्रदेशावरील समाजाची उत्पादकता

1) अ व ब योग्य
2) अ, ब व क योग्य
3) अ, ब, क व ड योग्य
4) अ व ड योग्य

59. जागतिक वन्यजीव सप्ताह खालीलपैकी कोणत्या आठवडयात साजरा केला जातो ?

1) ऑक्टोबरचा पहिला आठवडा
2) नोव्हेंबरचा पहिला आठवडा
3) डिसेंबरचा पहिला आठवडा
4) यापैकी नाही

60. आयुष वनांविषयी दिलेल्या विधानांचा विचार करा व योग्य विधान ओळखा.

अ) आयुर्वेदिक वनस्पतींच्या संवर्धनासाठी समर्पित 'आयुष वनांचे 19 ऑक्टोंबर 2021 रोजी उदघाटन केले

ब) शहरी भागातील हिरवाईचा दर्जा सुधारण्यासाठी आणि कच्छ विभागातील वृक्षांच्या आच्छादनाची घनता वाढविण्यासाठी या वनातील जमिनीवर झाडे लावण्यात येत आहेत

क) दीनदयाल पोर्ट ट्रस्टतर्फे देण्यात आलेल्या हरित पट्टयातील 30 एकर जमिनीवर हे 'आयुष वन' उभारण्यात आले

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क
3) फक्त ब
4) वरील सर्व

61. खालीलपैकी योग्य विधान ओळखा

अ) संयुक्त राष्ट्रसंघाची हवामान बदलावरील 16 वी परिषद कानकुन (मेक्सिको) येथे भरली

ब) या परिषदेत विकसित राष्ट्रांकडून विकसनशील राष्ट्रांना हवामान बदलावरील कृती कार्यक्रमांसाठी 30 अब्ज वित्तपुरवठा देण्याचे निश्चित करण्यात आले

1) फक्त अ योग्य
2) फक्त ब योग्य
3) अ व ब अयोग्य
4) दोन्ही योग्य

62. अणुभट्टीमध्ये उर्जा निर्मिती यामुळे होते

1) उदासीनीकरण अभिक्रिया
2) केंद्रकिय विखंडन
3) रासायनिक प्रक्रिया
4) विस्थापन प्रक्रिया

63. खालील विधाने लक्षात घ्या.

अ) कार्बन या मुलद्रव्याच्या केंद्रकात सहा प्रोटॉन असतात
ब) कार्बन या मूलद्रव्याच्या कक्षेत सहा इलेक्ट्रॉनचा समावेश असतो
क) कार्बन या मूलद्रव्याच्या केंद्राकत सहा प्रोटॉन व सहा इलेक्ट्रॉनचा समावेश असतो

1) फक्त अ योग्य
2) ब योग्य
3) अ व ब दोन्ही योग्य
4) अ व ब दोन्ही अयोग्य

www.spandancareers.org

64. योग्य जोडया लावा.

| (प्रजनन पध्दती) | (सजीव) |
|---|---|
| 1) कलीकायन | I) प्लॅनेरिया |
| 2) खंडी भवन | II) अमिबा |
| 3) मुकुलायन | III) स्पायरोगायरा |
| 4) पुनर्जनन | IV) किण्व |
| | V) हायड्रा |

1) I II III IV  2) IV III V I

3) IV II I III  4) V II IV III

---

65. खालीलपैकी अयोग्य पर्याय निवडा ?

अ) धमणी काठीण्यता या विकारामध्ये शरीरातील महत्वाच्या धमण्या कठीण होतात.

ब) तसेच धमण्यांमध्ये कोलेस्टेरॉल व सोडिअमचे प्रमाण कमी होते

क) यामुळे हदयाचा झटका येण्याची शक्यता असते

ड) सर्व योग्य आहे

1) फक्त अ  2) फक्त ब  3) फक्त क  4) फक्त ड

---

66. 55 kg वस्तुमानाचा खडक 27 m उंच कडेवर स्थित असेल तर त्याची स्थितीच उर्जा किती ?

1) 1070 j  2) 14553 j  3)1455 j  4) 1170 j

---

67. खालीलपैकी योग्य पर्याय निवडा ?

अ) शिरांमध्ये रक्तदाब हा खूप जास्त असतो

ब) शिरांच्या भित्तिका या जाड असतात

क) शिरा या गुरूत्वाच्या विरूध्द दिशेने रक्ताचे वहन करतात

ड) शिरा या शरीराच्या भागाकडून, हदयाकडे वापरलेले अशुध्द रक्ताचे वहन करते

1) फक्त अ आणि ड 2) फक्त ब आणि क  3) फक्त अ आणि ब  4) फक्त क आणि ड

---

68. खालील विधानांचा विचार करा.

अ) लाळेमध्ये टायलीन नावाचा पाचकरस असतो

ब) यकृतामध्ये पित्तरस तयार होतो तर स्वादुपिंडात स्वादुरस तयार होतो

1) अ अयोग्य, ब योग्य  2) अ योग्य, ब अयोग्य

3) दोन्ही योग्य  4) दोन्ही अयोग्य

---

69. मानवी डोळयाचा कोणता भाग आत येणाऱ्या किरणांना नियंत्रित करतो ?

1) कोरनिआ  2) इरिस  3) प्युपील  4) रेटीना

---

70. खालीलपैकी कोणती वनस्पती व्दिबीजपत्री आहे ?

अ) शेंगदाणा  ब) सुर्यफूल  क) आंबा  ड) पिंपळ  इ) मोहरी

1) वरील सर्व  2) यापैकी नाही  3) अ, ब, क  4) अ, क, ड, इ

---

71. पचनसंस्थेत होणाऱ्या खालील अभिक्रियांचा विचार करा.

अ) कर्बोदकांचे रूपांतर ॲमिनो आम्लात होते  ब) स्निग्ध पदार्थाचे रूपांतर मेदाम्लात होते

क) प्रथिनांचे रूपांतर शर्करात होते  ड) वरील सर्व अभिक्रिया योग्य आहेत

1) फक्त अ अयोग्य  2) फक्त ब योग्य  3) फक्त क योग्य  4) फक्त ड योग्य

---

72. खालील दिलेल्या विधानांपैकी कोणते विधान अयोग्य आहेत ते निवडा ?

अ) अवटू ग्रंथी ही सर्वात लहान अंत:स्त्रावी ग्रंथी आहे

ब) पीयुषिका ग्रंथी ही सर्वात मोठी अंत:स्त्रावी ग्रंथी आहे

क) अवटू ग्रंथी मेंदूमध्ये वसलेली असते

ड) पीयुषिका ग्रंथी घशायमध्ये कंठाच्या खाली वसलेली असते

1) अ, ब अयोग्य  2) क, ड अयोग्य  3) ब, ड अयोग्य  4) वरील सर्व अयोग्य

---

www.spandancareers.org

73. विद्युत चुंबकीय लहरीची पुढीलपैकी कोणती उदाहरणे आहेत ?

अ) दुरदर्शन लहरी ब) अतिनील किरण क) क्ष-किरण ड) सुर्यप्रकाश किरण

1) अ, ब, क 2) अ, ब, ड 3) अ व ब 4) अ, ब, क, ड

74. खालीलपैकी टेरिडोफायटा वनस्पतीबाबत योग्य विधाने ओळखा ?

अ) या वनस्पती बहुपेशीय असतात

ब) या वनस्पती स्वयंपोषीय असतात

क) या वनस्पतीमध्ये सुस्पष्ट संवहनी संस्था असतात

ड) यांचे अलैंगिक प्रजनन बिजाणू निर्मितीव्दारे, तर लैंगिक प्रजनन युग्मक निर्मितीव्दारे होते

1) अ, ब, क योग्य 2) अ, क, ड योग्य 3) अ, ब व ड 4) अ, ब, क, ड योग्य

75. असेंद्रीय जलप्रदुषके खालीलपैकी कोणती ?

अ) कॅडमिअम ब) शिसे क) पारा ड) चांदी

1) फक्त अ 2) ब व क 3) अ, ब व क 4) वरील सर्व

76. मोहन आणि अनिकेत यांचे वस्तुमान अनुक्रमे 50 कि.ग्रॅ. आणि 40 कि.ग्रॅ. आहे व त्यांच्यामधील अंतर 0.5 मीटर आहे. तर दोघांतील आकर्षण बल किती असेल ?

1) $533 \times 10^{-5}$ N 2) $533.6 \times 10^{-9}$ N 3) $5336 \times 10^{-7}$ N 4) यापैकी नाही

77. खालील विधानांचा विचार करा व योग्य पर्याय निवडा ?

अ) धमण्यांमध्ये साधारण: रक्तदाब हा खूप कमी असतो

ब) शिरांमध्ये रक्तदाब हा धमण्यांपेक्षा खूप जास्त असतो

क) धमण्यांच्या भित्तीका स्नायुयुक्त असतात

ड) शिरांच्या भित्तीका जाड असतात

1) अ व ब 2) फक्त क 3) फक्त क, ड 4) वरील सर्व

78. भारतीय रिझर्व्ह बॅकांचे खालीलपैकी मध्यवर्ती स्वरूपाचे कार्य करते ?

1) भारत सरकारचा कर वसूली अधिकारी म्हणून कार्य करणे

2) बॅकांची बॅक म्हणून कार्य करणे

3) केंद्र सरकारच्या अंदाजपत्रकाला अंतिम रूप देण्यात मदत करणे

4) निरनिराळया वित्तीय संस्थांच्या बेठकीत भाग घेणे

79 तीव्र मंदी दूर करण्यासाठी सरकारने मुद्दाम घडवून आणलेली तेजीची / चलनवाढीची परिस्थिती म्हणूजे .......................... होय.

1) मुद्रा अवपात 2) मुद्रा संस्फीती 3) स्टॅगफ्लेशन 4) स्टॅगनेशन

80. प्रादेशिक ग्रामीण बॅकांच्या विलीनीकरणासंबंधी 2005 मध्ये ए.व्ही. सरदेसाई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन अंतर्गत कार्य गटाने कोणत्या शिफारशी केल्या

1) 3 ते 5 वर्षात ज्या नफ्यात जाणार नाहीत. अशा बॅका बंद करण्यात याव्या

2) प्रादेशिक ग्रामीण बॅकांना म्युच्युअल फंड व विमा व्यवसाय करण्यास प्रोत्साहन द्यावे

3) या बँकांचे नियामक व पर्यवेक्षण आरबीआयने करावे

4) वरीलपैकी सर्व योग्य आहेत

81. भारताच्या दहाव्या पंचवार्षिक योजनेमध्ये खालीलपैकी कोणते वाक्य निश्चित केलेले नव्हेत ?

1) दारिद्रयात घट 2) सहकारास प्रोत्साहन

3) वृध्दी दर व रोजगारात वाढ 4) प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण

82. शेतकऱ्यांना शेती विकासासाठी जमिनीच्या तारणावर दीर्घ मुदतीचा कर्जपुरवठा करणारी बॅक कोणती ?

1) महाराष्ट्र बॅक 2) आरबीआय 3) भू-विकास बॅक 4) राज्य सहकारी बैक

83. विकसनशील देशामध्ये खालीलपैकी कोणत्या प्रकारची बेरोजगारी आढळते ?

1) खुली बेरोजगारी 2) संरचनात्मक बेरोजगारी 3) हंगामी बेरोजगारी 4) प्रछन्न बेरोजगारी

www.spandancareers.org

84. खालीलपैकी कोणत्या बॅकांना लहान व्यक्तीच्या बॅका असे म्हणतात ?

1) SBI समूह 2) प्रादेशिक ग्रामीण बॅका 3) स्थानिक क्षेत्रिय बॅका 4) भू-विकास बॅका

85 मोबाईलवरून होणाऱ्या ऑनलाईन व्यवहाराबाबत फोन पे ने नुकताच एक अहवाल जारी केला आहे, त्यावरून योग्य विधाने ओळखा.

अ) सर्वात जास्त ऑनलाईन व्यवहार चीनी ब्रँडच्या स्मार्टफोनवरून होतात

ब) ऑनलाईन व्यवहारासाठी वापरण्यात येणारे 45 टक्के स्मार्टफोन शाओमी आणि विवो या कंपन्यांचे आहे

क) देशात सर्वात जास्त युपीआय व्यवहार फोन पे च्या माध्यमातून होतो

ड) सर्वाधिक लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड वन प्लस वरून आर्थिक व्यवहार फक्त 6.4 टक्के होतो

1) अ, ब, क 2) ब, क, ड 3) अ, ब, क 4) क, ड

86. महाराष्ट्रात राज्य महिला आयोगाबाबत योग्य विधान/ने ओळखा

अ) रूपाली चाकणकर यांची महाराष्ट्रात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

ब) महाराष्ट्रात अधिनियम 1993 अंतर्गत स्थापन करण्यात आलेला हा एक संवैधानिक आयोग आहे

क) 4 फेब्रुवारी 2020 रोजी विजय रहाटकर यांनी महाराष्ट्रात राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) वरील सर्व

87. 21 सप्टेंबर रोजी साजरा करण्यात येणाऱ्या पोलिस स्मृती दिनाबद्दल योग्य विधान/ने ओळखा

अ) 1962 च्या भारत-चीन युध्दातील केद्रस्मृतीना उजाळा म्हणून स्मृतीदिन साजरा केला जातो

ब) स्मृतीदिनानिमित्त 2012 पासून पोलिस स्मारक चाणक्यपूरी येथे पोलीस परेड आयोजित केल्या जाते

1) अ योग्य 2) अ योग्य 3) अ, ब दोन्ही योग्य 4) अ व ब दोन्ही अयोग्य

88. भारताचे परराष्ट्रमंत्री एस.जयशंकर यांनी 19 ऑक्टोंबर 2021 रोजी भूदान ग्रोव्ह फलकाचे अनावरण खालीलपैकी कोणत्या देशात केले ?

1) इस्त्राईल 2) जपान 3) भूतान 4) ऑस्ट्रेलिया

89. खालील विधान वाचून योग्य विधान/ने ओळखा

अ) नूकतेच राष्ट्रीय संशोधन विकास महामंडळाच्या (National Research Development Corporation - NRDC) अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालकपदी कमांडर अमित रस्तोगी यांची नियुक्ती करण्यात आली आहे

ब) राष्ट्रीय संशोधन विकास महामंडळाची (NRDC) स्थापना राज्य सरकारने 1953 साली केली होती

1) अ, ब योग्य 2) अ, ब अयोग्य 3) अ योग्य 4) ब योग्य

90. कोविड 19 लसीकरण संदर्भात योग्य विधान/ने ओळखा

अ) भारताने 281 दिवसात 100 कोटी डोसचा टप्पा गाठला

ब) 100 कोटी वा डोस घेण्याचा मान अरूण राज यांना मिळाला

1) अ योग्य 2) ब योग्य 3) अ, ब दोन्ही योग्य 4) अ व ब दोन्ही अयोग्य

91. नेटवेस्ट गुपचा अर्थ गार्डियन्स पुरस्कार 2021 कोणत्या भारतीय संस्थेला देण्यात आला आहे ?

1) परंबिकूलम टायगर कन्सर्वेशन फाऊंडेशन 2) भारत सरकारची सेव्ह टाइगर संस्था

3) मेळघाटातील टायगर द किंग संस्था 4) आसाम सेव्ह टायगर संस्था

92. कोकणशक्ती कवायत कोणत्या देशांमध्ये होणार आहे ?

अ) भारत ब) बांगलादेश 3) युनायटेड किंगडम 4) सिंगापूर

1) अ, ब 2) अ, क 3) अ, ड 4) अ, ब, क, ड

93. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच कुशीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उदघाटन केले, त्याबद्दल अयोग्य विधाने कोणते ?

अ) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उत्तर प्रदेशातील कुशीनगर येथे ऑक्टोंबर 2021 रोजी विमानतळाचे उदघाटन केले

ब) उत्तरप्रदेश मध्ये आता एकूण 2 आंतरराष्ट्रीय विमानतळ झाले आहे

क) कुशीनगर येथील महापरिनिर्वाण मंदिरात अधिनियम कार्यक्रमात ते सहभागी झाले होते

1) फक्त अ 2) फक्त ब, क 3) फक्त अ, क 4) फक्त ब

94. जागतिक ऊर्जा दृष्टिकोन (WEO) अहवाल 2021 नुकताच कोणी सादर केला ?

1) आंतरराष्ट्रीय ऊर्जा एजन्सी (IEA) 2) आंतरराष्ट्रीय सौर आघाडी (ISA)

3) संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम (UNEP) 4) यापैकी नाही

95. माऊंट हॅरिएट बेट नूकतेच चर्चेत आले त्या विषयी बिनचूक विधान/ने कोणते ?

अ) केंद्र सरकारने लक्षव्दीप बेटामधील माऊंट हॅरिएट बेटाचे नामकरण करण्याचा निर्णय् घेतला आहे

ब) माऊंट हॅरिएट बेट आता मणिपूर पर्वत म्हणून ओळखला जाणार आहे

क) 1857 च्या उठावात आणि 1891 मध्ये ईशान्येकडील ब्रिटीशांचा प्रतिकार करण्यात मणिपूरने महत्वाची कामगिरी केली होती

1) फक्त अ, ब 2) फक्त ब, क 3) फक्त अ 4) वरील सर्व

96. इंडिया इंटरनेट प्रशासन मंचाविषयी दिलेल्या विधानातून योग्य विधाने निवडा

अ) संयुक्त राष्ट्रांच्या इंटरनेट प्रशासन मंचाच्या टयुनिस कार्य धोरणाच्या नियमानुसार इंडिया इंटरनेट प्रशासन मंचाची निर्मिती करण्यात आली आहे

ब) देशात सध्या सुमारे 80 कोटी इंटरनेट वापरकर्ते असून भारत सर्वात मोठा इंटरनेटव्दारे जोडलेला दुसरा देश आहे

क) या मंचाचा उद्देश इंटरनेट प्रशासनात सहभागी सर्व भागीदारांना एका मंचावर आणणे

1) अ, ब 2) ब, क 3) अ, क 4) वरील सर्व

97. इंटेल उन्नती कार्यक्रमा बद्दल योग्य विधान/ने कोणते ?

अ) इंटेलने भारतातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना उद्योगासाठी उपयुक्त असलेल्या डेटा-कैंद्रित कौशल्याने सुसज्ज करण्यासाठी 21 ऑक्टोंबर 2021 रोजी हा कार्यक्रम सुरू केला

ब) इंटेलने 2022 पर्यंत 100 इंटेल उन्नती डेटा सेंद्रिक लॅबची स्थापन करण्याचे ध्येय ठेवले आहे

क) भारतातील एकूण 29 महाविद्यालयात इंटेल उन्नती कार्यक्रम सुरू करण्यात आला

ड) महाराष्ट्रातील सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयात हा कार्यक्रम सुरू केला

1) फक्त अ, ब, क 2) फक्त ब, क 3) फक्त अ, ब 4) वरील सर्व

98. संयुक्त राष्ट्र संघाने 21 ऑक्टोंबर 2021 रोजी विशेष ट्रस्ट फंड खालीलपैकी कोणत्या देशासाठी केला ?

1) भारत 2) अफगणिस्तान 3) नेपाळ 4) जर्मनी

99. संयुक्त राष्ट्र संघाने 21 ऑक्टोंबर 2021 रोजी अफगणिस्तानसाठी विशेष फंड ट्रस्ट स्थापन केला त्याबाबत योग्य विधाने कोणती ?

अ) भारत या निधीत प्रथम योगदान देणारा देश आहे

ब) जर्मनी 50 दशलक्ष युरो निधी देणार आहे

क) युनायटेड नेशन्स डेव्हलपमेंट प्रोग्राम (UNDP) नुसार 2022 च्या मध्यापर्यंत 97% अफगाण कुटुंबे दारिद्रय रेषेखाली राहतील, त्यामुळे हानिधी निर्माण केला

ड) IMF ने 2021 मध्ये अफगणिस्तानची अर्थव्यवस्था 30% पर्यंत संकूचित होणार असे सूचविले

1) ब, क, ड 2) अ, ब, क 3) अ, क, ड 4) वरील सर्व

100. खालीलपैकी योग्य असणारे विधाने ओळखा

अ) कुशीनगर विमानतळ हे उत्तप्रदेशातील दुसरे आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे

ब) कुशीनगर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे उदघाटन राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते करण्यात आले

क) कुशीनगर विमानतळावरील उत्तरप्रदेशातील आतापर्यंतचा सर्वात लांब रन वे आहे

1) अ, ब 2) क 3) अ, क 4) ब, क़

www.spandancareers.org